प्रेसनोट दि. २६/०५/२०२१

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | मुंबई विभाग |
| गुन्हा नोंद क्रमांक | २५/२०२१ |
| कलम | ७, १२ भ्र.प्र. अधिनियम १९८८ |
| आरोपीचे नाव व कार्यालय | १) संतोष पवार, कनिष्ठ अभियंता, इमारत व कारखाने विभाग, पी/नॉर्थ वॉर्ड, बृहन्मुंबई महानगरपालिका, लिबर्टी गार्डनजवळ, मालाड(प.), मुंबई<br>२) अब्दुल आहद खान (खाजगी इसम), वय- ४३ वर्षे, धंदा- फॅब्रिकेशन, बुध्दनगर, मार्वे क्रॉस रोड, रुम नं. ११०, मालवणी, मालाड (प.), मुंबई-९५ |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | रु. १,१०,०००/- |
| स्विकारलेली रक्कम | रु. ५०,०००/- (पहिला हफ्ता) |
| थोडक्यात माहिती | यातील फिर्यादी याचे भावाच्या मालकीचे मालवणी मालाड(प.), मुंबई येथील घराचे छताचे व इतर बांधकाम चालू होते. बृहन्मुंबई महानगरपालिका पी/नॉर्थ वॉर्ड, मालाड, मुंबई येथील कनिष्ठ अभियंता संतोष पवार यानी बांधकाम ठिकाणी येवून घराचे बांधकामाचे फोटो काढून घेतले व सदरचे काम अवैधरित्या चालू असल्याचे सांगुन भेटण्यास सांगितले.<br>सदरचे बांधकामावर कोणतीही कारवाई करु नये अशी विनंती करण्यासाठी आलोसे संतोष पवार यास फिर्यादी भेटले असता, आलोसे संतोष पवार यानी फिर्यादी यांचेकडे रू. १,४०,०००/- इतकी लाचेची रक्कम मागणी केली होती. सदर बांधकामावर कारवाई न करण्यासाठी मे महिन्याच्या पहिल्या आठवडयात लोकसेवक संतोष पवार याने तकारदार यांचेकडून रू ३०,०००/- लाच घेतलेली होती.<br>उर्वरित पैशाची मागणी आलोसे संतोष पवार वारंवार करीत होते. आलोसे संतोष पवार याने लाचेच्या उर्वरित रक्कमेसाठी तगादा लावला होता. आलोसे संतोष पवार यास लाच देण्याची फिर्यादी यांची इच्छा नसल्याने फिर्यादीने दि. २३/०५/२०२१ रोजी लाप्रवि, मुंबई कार्यालयाकडे लेखी तक्रार दिली. दि. २४/०५/२०२१ रोजी पडताळणी दरम्यान आलोसे संतोष पवार यानी फिर्यादी यांचेकडे रू. १,१०,०००/- लाचेची मागणी केली. दि.२५/०५/२०२१ रोजीच्या सापळा कारवाई दरम्यान आलोसे संतोष पवार यानी लाचेची रक्कम मालवणी परिसरातील त्यांचे मित्र आरोपी खाजगी इसम नामे अब्दुल आहद खान यांचेकडे देण्यास सांगितले.<br>खाजगी इसम आरोपी क. २ अब्दुल आहद खान याने तकारदार यांचेकडून लगून महाकाली रोड, मानवथल बिल्डीगच्या समोरील प्रवीण ऑटो पार्ट दुकानाच्या बाजूला, चहाच्या दुकानासमोर आलोसे संतोष पवार यांचे सांगण्यावरुन पंचासमक्ष रू. ५०,०००/- लाच स्विकारली असता खाजगी इसम अब्दुल आहद खान यास रंगेहाथ पकडण्यात आले. आलोसे संतोष पवार यांचा शोध चालू आहे. नमुद दोषाविरुध्द कलम ७, १२ भ्र. प्र. अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. |

**लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभागाकडे संपर्क साधावा.**

संपर्क : लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग, ९१,सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई- ३०.
संकेतस्थळ- acbmaharashtra.gov.in
ईमेल :(1) acbwebmail@mahapolice.gov.in (2) addlcpacbmumbai@mahapolice.gov.in
ऑनलाईन तक्रार अॅप्लीकेशन- www.acbmaharashtra.net
टोल फ्री क्र १०६४
दूरध्वनी क्र.०२२-२४९२१२१२, फॅक्स क्र.०२२-२४९२२६१८,
व्हॉट्स अॅप क्रमांक- ९९३०९९७७००

( विजयकुमार डोके )
सहाय्यक पोलीस आयुक्त
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई